# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक २२.०१.२०२३ (रविवार)

---

## जबरी चोरी

**पोलीस स्टेशन रामटेक** :- अंतर्गत मौजा पटगोवारी फिर्यादीचे राहते घरी १० किमी पश्चिम. येथे फिर्यादी हा त्याचे राहते घरी झोपले असता, यातील अनोळखी दोन इसमांनी देवघराचे दाराचे कडी तोडुन आत प्रवेश करुन फिर्यादीस लोखंडी आलमारीची चाबी मागुन लोखंडी कपाटात ठेवलेले सोन्याचे दागीने व रोख रक्कम चोरुन दिनांक २१.०१.२०२३ चे १९/०० ते १९/१५ वा दरम्यान चोरून नेले. तसेच फिर्यादीचे आईला चाकुचा धाक दाखवुन तिचे कानात घातलेले टॉप्स जबरीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे- मंजित जनार्दन बिच्छोरे वय ३२ वर्ष रा. पटगोवारी ता. रामटेक जि. नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे अनोळखी आरोपीविरूध्द कलम ४५८, ३९२, ३४ भादवि अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास - मसपोनि निशा भुते पोस्टे रामटेक ९८२२५६६१८० हे करीत आहे.

## जनावर चोरी

**पोलीस स्टेशन मौदा** :- अंतर्गत गुमथळा ता कामठी १५ कि मी पश्चिम. येथे फिर्यादीच्या शेतावरील खुल्या टिनाच्या शेडमधुन तिन कोसी लाल रंगाच्या गायी कि प्रत्येकी ६०,०००/-रू प्रमाणे १,८०,०००-/रू चा माल दिनांक २१/०१/२०२३ चे ०१/३० वा ते २१/०१/२०२३ चे ०६/०० वा दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने चोरी करून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे- नविन हरिनारायण शाहु वय ४० वर्ष रा प्लॉट नं ५०५ शाहु भवन सक्करदरा चौक नागपूर यांनी दिलेल्या रिपोर्टवरून अज्ञात आरोपविरूध्द पोस्टे मौदा येथे कलम ३८० भादवि अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पो हवा भगवान चांदेवार मो क्र ९७६५२२१११६ हे करीत आहे.

## दुखापत

**पोलीस स्टेशन पारशिवनी** :- अंतर्गत मौजा एरिकेशन कॉलोनी तामसवाडी ०७ किमी दक्षिण. यातील घटना ता. वेळी व ठिकाणी **जुन्या झगडयाच्या कारणावरून** यातील आरोपी याने फिर्यादीचे वडीलांना शिवीगाळ करित असता फिर्यादी याने आरोपी यास "तु माझा वडीलाला शिवीगाळ का करित आहे " अशी विचारणा केली असता, त्याने फिर्यादीला दोन तिन झापडा मारले व पॅन्टच्या खिशातुन कोणतेतरी धारदार वस्तुने कपाळावर , उजव्या हाताचे पंज्यावर आणि डाव्या पायाचे मांडीवर मारून जखमी केले व शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली

सदर प्रकरणी फिर्यादी नामे- मयुर विनायक लोंखंडे वय २१ वर्ष रा. तामसवाडी यांनी दिलेल्या रिपोर्टवरून आरोपी नामे- अर्पण नरेश बनकर वय २१ वर्ष रा. तामसवाडी यांचे विरूध्द पोस्टे पारशिवनी येथे कलम ३२४,५०४, ५०६ भादवि अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पो हवा प्रभाकर झोड मो.क्र. ८८०६३५३४४६ हे करीत आहे.

## दुखापत

**पोलीस स्टेशन रामटेक** :– अंतर्गत वार्ड क्र. ०५ कांन्द्री माईन रामटेक. यातील फिर्यादी व आरोपी हे पती – पत्नी असून दिनांक २०/०१/२३ चे २२.०० ते २२.३० वा. दरम्यान, यातील आरोपीने फिर्यादीस “तलाक दे” असे म्हणुन झगडा भांडन करुन हातात असलेल्या काठीने फिर्यादीच्या डोक्यावर डाव्या हातावर, उजवे हाताचे बोटावर मारुन जखमी केले.व फिर्यादीचा मुलगा झगडा भांडण सोडविण्याकरीता गेला असता, त्याला सुध्दा आरोपीने काठीने मारुण जखमी केले

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सौ. अनिता उत्तम पिल्ले वय ४० वर्ष रा. वार्ड क्र. ०५ कांन्द्री माईन ता. रामटेक जि. नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपी नामे – उत्तम कन्हैयालाल पिल्ले यांचेविरूध्द पोस्टे रामटेक येथे कलम ३२४ भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास – पोहवा/राजेन्द्र अडामे पोस्टे रामटेक हे करीत आहे.

**पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे**
**मो क्र ९४२२६१४६३३**
**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपुर**